पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी — ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ५८ दिनांक ०८/१०/२०२२

# चोरीच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींना अटक करण्यात जव्हार पोलीसांना यश.

दि.०३/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे रिंकेश रोहीदास ठाकरे वय २९ वर्षे धंदा नोकरी-(इंडस टॉवर फिल्ड ऑफीसर) रा. नेहरोळी ता. वाडा जि. पालघर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन, भारत पेट्रोल पंपासमोरील टॉवर क्र.१०५३०२१ जवळ ता. जव्हार जि. पालघर येथे एअरटेल कंपनीचे ABIA चे तीन BTS कार्ड, ASAI चे १ BTS कार्ड, असे वर्णनाचे व VI कंपनीचे ६-RUS-02BO चे BTS कार्ड असे वर्णनाचे एकूण १,७५,,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरुन घेऊन गेले म्हणून जव्हार पोलीस ठाणे गु.र.नं. क्रमांक I १८९/२०२२ भा.द.वि.स कलम ३७९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरीलप्रकारच्या वाढत्या गुन्ह्यांचे प्रमाण लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अप्पासाहेब लेंगरे, पोलीस निरीक्षक जव्हार पोलीस ठाणे व पोउपनि/जितेंद्र अहिरराव व जव्हार पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार यांनी नमुद गुन्ह्यात कोणताही पुरावा सोडला नसताना अथवा धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तांत्रीक तपास करुन पाच संशयीत आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले.

तसेच आरोपींनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा. रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| ०१ | जव्हार पोलीस ठाणे | गुन्हा. रजि.क्र. I १८९/२०२२, भादंविसं कलम ३७९, ३४ |
| ०२ | जव्हार पोलीस ठाणे | गुन्हा. रजि.क्र. I ९९/२०२१, भादंविसं कलम ३७९, ३४ |
| ०३ | विक्रमगड पोलीस ठाणे | गुन्हा. रजि.क्र. I २०८/२०२२, भादंविसं कलम ३७९, ३४ |
| ०४ | शहापुर पोलीस ठाणे, जिल्हा ठाणे ग्रामीण | गुन्हा. रजि.क्र. I ४००/२०२२, भादंविसं कलम ३७९, ३४ |

वरील नमुद आरोपीत यांचेकडून एकूण १८,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अप्पासाहेब लेंगरे,पोलीस निरीक्षक जव्हार पोलीस ठाणे, पोउपनि/जितेंद्र अहिरराव, पोहवा/८८१७ जी. एस. भोये, पोना/७५० भोगाडे, पोना/५ गांगुर्डे, पोशि/३६४ काकड सर्व नेमणुक जव्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


महाराष्ट्र पोलीस
जव्हार पोलीस ठाणे
जिल्हा पालघर



पालघर जिल्हा पोलीस दल
महाराष्ट्र पोलीस
जव्हार पोलीस ठाणे
जिल्हा पालघर